आजचे कार्यक्रम

* कॅन्सर प्रतिबंध या उद्देशाने आयोजित कार्यक्रम डॉक्टर्स ऑन ड्युटी चर्चासत्र भाग २ कर्कायन- चला रोखूया कॅन्सर संध्या ५वा. , गुरुदक्षिणा सभागृह, कॉलेजरोड, सहभाग, डॉ. विजय घाटगे, कार्डिओलॉजिस्ट डॉ. नितीन घैसास, गायनॅकोलॉजिस्ट डॉ. चंद्रकांत संकलेचा, लाईफस्टाईल कन्सल्टन्ट डॉ. विनिता देशपांडे

* ए एन करा ओके क्लबतर्फे गोल्डन एरा अर्थात सुरेल सुवर्णयुग मैफल सायंकाळी ६ वाजता परशुराम साईखेडकर नाट्यगृह

* स्व.पोपटराव हिरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त विद्या वाचस्पती विवेक घळसासी यांचे व्याख्यानमाला वेळ सायं.६ वा., रावसाहेब थोरात सभागृह, गंगापूर रोड

अल्काराझ अंतिम फेरीत

विम्बल्डन २०२५ : अमेरिकच्या टेलर फ्रिट्झचा पराभव

लंडन । दि.११ वृत्तसंस्था

विम्बल्डन २०२५ स्पर्धेतील पुरुष एकेरीतील पहिल्या उपांत्य फेरीतील लढतीत स्पॅनिश कार्लोस अल्काराझ याने टेनिस कोर्टवरील आपला दबदबा कायम राखत सलग तिसऱ्यांदा स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे. नदालनंतर सलग तीन वेळा फायनलमध्ये पोहचणारा तो दुसरा स्पॅनिश टेनिसपटू ठरला आहे.

अमेरिकन टेनिसपटू टेलर फ्रिट्झचा ६-४, ५-७, ६-३, ७-६ (६) असा पराभव करून कार्लोस अल्काराझने वयाच्या २२ व्या वर्षी कारकिर्दीतील सहाव्या विजेतेपदाच्या दिशेने वाटचाल केली आहे. मागील दोन वेळच्या विम्बल्डन चॅम्पियन असलेल्या कार्लोस अल्काराझने २४ विजयासह तिसऱ्यांदा फायनलमधील प्रवेश पक्का केला आहे. २०२३ आणि २०२४ च्या विम्बल्डन स्पर्धेत त्याने नोव्हाक जोकोविचला पराभूत करून जेतेपद पटकावले होते.

फ्रिट्झला अल्काराझविरुद्ध पाचवा सेट जिंकण्याची दोन संधी होती, त्याने चौथ्या सेटच्या टायब्रेकरमध्ये ६-४ अशी आघाडी घेतली होती. पण अल्काराझने जबरदस्त कमबॅक करत सेटसह मॅच जिंकून या स्पर्धेतील आपली बादशाहत टिकवण्यासाठी पुढे वाटचाल केली. अमेरिकच्या टेलरनं अप्रतिम खेळ केला. पण शेवटी अल्काराझसमोर त्याचा निभाव लागला नाही. पुरुष एकेरीतील दुसऱ्या उपांत्य फेरीत नोव्हाक जोकोविच आणि यानिक सिनर यांच्यात ब्लॉकबस्टर सामना रंगणार आहे. या सामन्यातील विजेता रविवारी अल्काराझविरुद्ध जेतेपदासाठी अंतिम सामन्यासाठी कोर्टवर उतरल्याचे पाहायला मिळेल. गत स्पर्धेप्रमाणे पुन्हा जोकोविच-अल्काराझ यांच्यात लढत होणार की, सिनर फायनलमध्ये स्पॅनिश स्टारला टक्कर देणार ते पाहणे महत्त्वाचे असेल.

'देशदूत' समर धमका कूपन स्पर्धेचा निकाल जाहीर

नाशिक । प्रतिनिधी

'देशदूत' आयोजित समर धमाका कूपन स्पर्धेचा निकाल नुकताच सोडत पद्धतीने जाहीर करण्यात आला. पहिल्या दोन विजेत्यांना अनुक्रमे सायकल व कुलर बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे.

प्रथम बक्षीस युवराज अनिल खैरे यांनी पटकावले, तर द्वितीय बक्षीस भूषण दिगंबर महाजन यांना मिळाले आहे. पहिल्या दोन विजेत्यांना अनुक्रमे सायकल व कुलर बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे. २६ एप्रिल ते ३१ मे या कालावधीत समर धमाका कूपन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नाशिक शहर व जिल्ह्यातून अनेक वाचकांनी स्पर्धेत भाग घेतला. सोमवार (दि. १४) पासून सात दिवसांच्या आत महात्मा गांधी रोड येथील 'देशदूत'च्या कार्यालयात संपर्क साधून ओळखपत्र दाखवून आपले बक्षिसे घेऊन जावीत. तसेच, अधिक माहितीसाठी स्पर्धकांनी ९७६७१३४५४६ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

कुकर विजेते

उत्कर्षा संदीप भोसले (वावी)
देवयानी तुषार घुगे (रानवड)
सुधीर नावरकर (ओझर)
राजेंद्र रणशिंगे (सुकेणे)
संस्कार राजेंद्र जोशी (नवीन नाशिक)

डिनर सेट विजेते

साई संतोष पुंड (अंदरसूल)
यश मनोहर भोगे (चांदवड)
श्रुतिका नीलकंठ खैरनार (चांदवड)
धनश्री उमेश काकड (ठाणगाव)
अवधूत योगेश मोगल (सिन्नर)

राष्ट्रवादी युवक (शप) च्या शहराध्यक्षपदी समाधान कोठुळे

नाशिक । प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रवादी युवक शहराध्यक्षपदी समाधान नामदेव कोठुळे यांची नियुक्ती करण्यात आली.

प्रदेशाध्यक्ष आ.जयंतराव पाटील यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नाशिक शहर जिल्हाध्यक्ष पदी समाधान कोठुळे यांची नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार साहेब यांच्या विचारानुसार पुढील काळात राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या माध्यमातून सर्वसामान्य युवकांच्या विकासात आपण भरीव कार्य कराल व पक्ष संघटना मजबुतीने उभी कराल ही अपेक्षा नियुक्तीपत्रात व्यक्त करण्यात आली. आहे. समाधान कोठुळे यांना मुंबई येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश अध्यक्ष महेबुब शेख यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.यावेळी पक्ष निरीक्षक उमेशजी अग्रवाल उपस्थित होते.

समाधान कोठुळे यांच्या नियुक्तीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालय नाशिक येथे सत्कार करण्यात आला. यावेळी खा. भास्कर भगरे, जिल्हाध्यक्ष दत्ता पाटील, प्रदेश उपाध्यक्ष गोकुळ पिंगळे ,शहराध्यक्ष गजानन शेलार ,लक्ष्मण मंडाले,उदय सांगळे, मुन्ना अन्सारी ,शाम हिरे ,अशोक मोगल,दिनेश धात्रक, सचिन आहेर, अशोक पाळदे,उमेश खताळे आदीसह युवक मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते.

समाधान कोठुळे यांचे पक्षाच्या विस्तारात मोलाचे योगदान राहिले आहे. त्यांनी अखंड राष्ट्रवादी असतांना युवक शहर उपाध्यक्ष पदाची धुरा सांभाळली आहे. राष्ट्रवादी युवक नाशिकरोड विभाग अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली आहे.

सुला विनियार्डला जागतिक पुरस्कार

नाशिक । भारतातील आघाडीची आणि सर्वाधिक पुरस्कारप्राप्त वाईन उत्पादक कंपनी असा नावलौकिक मिळालेल्या सुला विनियार्डच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. जगातील सर्वात मोठ्या व प्रतिष्ठित 'डिकँटर वर्ल्ड वाईन अवॉर्ड्स २०२५'पुरस्कार सोहळ्यात 'सुला'च्या चार वाईनला रौप्य पदक मिळाले आहेत.

सुलाच्या द सोर्स शेनिन ब्लाँक रिजर्व, द सोर्स सॉव्हिन्यॉन ब्लाँक रिजर्व, दिंडोरी रिजर्व शार्डोने आणि दिंडोरी रिजर्व वियोनिए या उत्पादनांना पारितोषिके प्राप्त झाली आहेत. ही उत्पादने भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही लोकप्रिय ठरली आहेत.'सीओओ आणि मुख्य वाइन उत्पादक गोरख गायकवाड म्हणाले की, डिकँटर वर्ल्ड वाईन अवॉर्ड्समध्ये सन्मान मिळणे ही अभिमानाची गोष्ट आहे. ग्राहकांनी आमच्यावर टाकलेल्या विश्वासावर या पुरस्कारातून शिक्कामोर्तब झाले आहे.

सायबर फसवणुकीचा नाशकात पहिला बळी

(पान १ वरून) ६ जून २०२५ रोजी ही घटना घडली आहे. याबाबत त्यांची पत्नी हर्षाली यांनी फिर्याद नोंदविली आहे. त्यानुसार, डिसेंबर २०२३ ते ६ जून २०२५ या कालावधीत प्रशांत पाटील यांच्या फेसबूक ॲपवर संशयित अकाऊंट धारकाने यूआरएल https://www.facebook.com/padma.v.chikte व इ-मेल आयडी padmavchiktegmail.com आणि मोबाईल कमांक ९१५६०९७८०५ वरुन मेल व संपर्क साधला. त्यानंतर, हापको ऑईलचा व्यवसाय करण्याचे आमिष दाखवून पाटील यांना गुंतवणूक करण्यास भाग पाडले. नवीन व्यवसायास आणि नफा मिळेल, यासाठी पाटील यांनी मित्र राजेश जीवन जाधव, हरिश्चंद्र पांडू भरसट व मोहित संदीप एखंडे यांच्याकडून कर्जाने व उसने पैसे घेतले. तब्बल ५५ लाख ७९ हजार रुपये जमा होताच, पाटील यांनी संशयितांच्या सांगण्यानुसार विविध बँक खात्यांत हे पैसे गुंतविले. मात्र, अनेक दिवस होऊनही परतावा व ऑईल व्यवसायासंबंधी काम होत नसल्याने ते विवंचनेत सापडले. त्यांनी संशयितांना वारंवार संपर्क साधला. मात्र, अपयश आले. त्यामुळे फसवणूक झाल्याची जाणीव होताच, ते तणावात गेले. मित्रांचे पैसे व कर्ज कसे फेडायचे या विवंचनेत असतांना त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली.

शिरसाट पुन्हा अडचणीत

(पान १ वरून) बोलताना दिसत आहेत. या बेडच्या शेजारी पैशांची मोठी बॅग असल्याचे पाहायला मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मला दया येते! स्वतःच्या अब्रूचे आणखी किती धिंडवडे ते फक्त पाहात बसणार आहेत ? हतबलतेचे दुसरे नाव फडणवीस! असे राऊत यांनी हा व्हिडिओ पोस्ट करताना म्हटले असून यात कोणाचेही नाव घेतलेले नाही. दरम्यान, यावर संजय शिरसाट यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, मी आत्ताच तुमच्या मित्राकडून तो व्हिडिओ पाहिला. व्हिडिओमध्ये तुम्ही पाहतायत ते माझे घर आहे. बेडरूममध्ये मी बसलेलो आहे. बाजूला माझा सर्वात लाडका कुत्रा आहे. व्हिडिओबद्दल मला आश्चर्य नाही, यात काही गैर नाही. तर केवळ लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला जात आहे. एक बॅग ठेवलेली आहे. एवढी मोठी बॅग जर पैशाची ठेवायची असेल तर अलमाऱ्या काय मेल्यात का? या बॅगमध्ये पैसे नाहीत तर कपडे आहेत, असा दावाही संजय शिरसाट यांनी केला आहे.संजय राऊतांनी ठरल्याप्रमाणे भुंकण्याचे काम केले आहे. एकनाथ शिंदे दिल्लीला अमित शहा यांना भेटले आणि त्यांनी सांगितले की माझा पक्ष वेळ पडल्यास विलीन करा. परंतु मला मुख्यमंत्री करा. आता हे सगळे पाहिले, तर यांना संताजी-धनाजी दिसतात का असा प्रश्न आहे. मूर्खासारखे बोलतात. यांना जिथे तिथे एकनाथ शिंदे दिसतात. गेलेली सत्ता त्यांना स्वस्थ बसू देत नाही अशी टीका शिरसाट यांनी राऊत यांच्यावर केली.

आयएमएचा संप तूर्तास मागे

नाशिकरोड । होमिओपॅथिक डॉक्टरांना ऍलोपॅथिक औषधे लिहिण्याची सरकारकडून मिळालेली परवानगी आणि त्या विरोधातील आंदोलनाचा मुद्दा चिघळत असतानाच, अखेर मुख्यमंत्र्यांच्या प्रत्यक्ष हस्तक्षेपानंतर इंडियन मेडिकल असोसिएशनने प्रस्तावित एक दिवसीय संप मागे घेतला आहे. यामुळे नाशिकरोड भागातील सर्व खासगी रुग्णालये सुरळीत सुरू राहिली आणि रुग्णांमध्ये निर्माण झालेली अनिश्चितता दूर झाली.

रुग्णसेवेवर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता, गुरुवारी संध्याकाळी आयएमएचे राज्य अध्यक्ष डॉ. संतोष कदम यांची राज्य सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट घेऊन चर्चा केली. या बैठकीत डॉक्टरांच्या मागण्यांवर सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन सरकारने दिले. यानंतर नाशिकरोड शाखेच्या अध्यक्षा डॉ. कांचन लोकवाणी यांनी संप काही काळासाठी पुढे ढकलल्याची माहिती दिली. त्यामुळे शुक्रवारी नाशिकरोड परिसरातील सर्व खासगी रुग्णालये सुरू होती आणि रुग्णांना दिलासा मिळाला.

सार्वजनिक मद्यपानावर 'समिती'चा उतारा

(पान १ वरून) करणे आवश्यक आहे.पूर्वीच्या आश्वासनांची पूर्तता न होण्याचा अनुभव पाहता, या नवीन समितीच्या कामाबद्दलही प्रश्नचिन्ह निर्माण होते. मुनगंटीवार यांनीच गेल्या अधिवेशनात दिलेल्या 'आडवी बाटली' बंद करण्याच्या आश्वासनाची आठवण करून दिली, ज्यावर चार महिने उलटूनही कोणताही निर्णय झालेला नाही. जर अशा छोट्या निर्णयांनाही विलंब होत असेल, तर एका मोठ्या सामाजिक समस्येवर समिती आणि कायद्याच्या माध्यमातून त्वरित तोडगा निघेल, अशी अपेक्षा करणे कितपत योग्य आहे?

किकवी धरण भूसंपादन दर निश्चित

नाशिक । किकवी धरण प्रकल्पाच्या भूसंपादन प्रक्रियेस गती देण्यासाठी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली काल जिल्हाधिकारी कार्यालयात दर निश्चित करण्यात आले. यासाठी गुणाकार पद्धतीने मूल्यांकन करण्यात येणार आहे. शासनातर्फे शेतकऱ्यांसाठी २५ टक्के अतिरिक्त अनुदान देण्यात येणार असून, शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून भूसंपादन प्रक्रिया पारदर्शकपणे राबवली जाणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

इव्हीएम सज्ज ठेवा

(पान १ वरून) होणारी धावपळ टळू शकेल. मतदार संख्या, मतदार केंद्र, उपलब्ध इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि उपलब्ध मनुष्यबळ इत्यादींची आपल्या स्तरावरील उपलब्धता लक्षात घ्यावी. मतदान यंत्रांची प्राथमिक तपासणी झाल्यानंतर आवश्यक संख्येचा अंदाज घेता येईल. मनुष्यबळाबाबत विभागीय आयुक्तांनी समन्वयकाची भूमिका घेऊन सर्व महानगरपालिका आयुक्तांसोबत वेळोवेळी आढावा घ्यावा तर मतदाराची संख्या लक्षात घेऊन मतदान केंद्रांची अचूक संख्या निश्चित करता येईल. त्या आधारे पुढील नियोजन करणे सुलभ होईल. मतदान केंद्राचा अचूक अंदाज आल्यावर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या आवश्यकतेबाबतही नियोजन करता येईल. मनुष्यबळाचाही अंदाज येईल. विभागीय आयुक्तांच्या समन्वयातून आजुबाजूच्या जिल्ह्यातील मनुष्यबळ उपलब्ध करून घेता येईल. एकूणच तयारीबाबतची सर्व तपशीलवार आणि अद्ययावत माहिती तयार ठेवावी. त्याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येईल, असे निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी यावेळी सांगितले.

स्थानिक भाव

सोने (प्रति १० ग्रॅम)	
२४ कॅरेट	९७,५००
२२ कॅरेट	८९,७००
चांदी (प्रति किलो)	
११०५००	

शेअर बाजार

सेन्सेक्स	८२,५००
	(-६९०)
निफ्टी	२५,१५०
	(-२०५)

कोथिंबीर आवकेत वाढ

नाशिक । पावसाने उघडीप दिल्याने यार्डात पालेभाज्यांची आवक वाढली आहे. कोथिंबीर ३२ हजार ५०० जुडी आवक झाली. तर मेथी १२ हजार जुडी, शेपू ६ हजार आणि कांदापात ४४५० जुडी आवक झाली. त्यामुळे या भाज्यांचे दर घसरले होते. कोथिंबीर गावठी, हायब्रीड प्रकारानुसार ६०० ते ६,००० रुपये शेकडा दराने विक्री झाली. सरासरी दर २,५५० ते ३,५०० रुपये शेकडा दराने लिलावात विक्री झाली. मेथह प्रतवारनुसार १,००० हजार रुपये ते २,९०० रुपये आणि सरासरी १,९५० रुपये दराने विक्री झाली. कांदापात २,५०० ते ६,१०० रुपये शेकडा दराने विक्री झाली.

शब्दकोडे : २९९



आडवे शब्द : १) पिचकारीने रंग उडविण्याचा सण. ५) लिहिता वाचता येणे. ९) श्रीविष्णुचे एक नाव. ११) गाणे. १२) जंगली. १४) वारा. १५) नृत्य. १६) सबब, निमित्त. १७) सैन्याचा प्रमुख. १८) साहित्यातील एकूण भावना. २०) सांगणे. २२) सुसर. २३) ओलसर हवा. २६) डोक्याचा वरचा भाग. २९) रसाळ. ३१) दिल्लीचे विमानतळ. ३२) घाणीचे साम्राज्य असलेली जागा. ३३) घर फिरले की घराचे ** ही फिरतात. ३४) टरफल. ३५) जंगलात राहणे. ३७) लहानसहान. ३९) शपथ, आण. ४०) लक्ष्मी-नारायण. ४५) ओरखडा. ४६) शिर्डीचे संत. ४९) आगीत पूर्ण जळून जाणे. ५१) काटकी, गवताचा तुकडा. ५२) गरजू मनुष्य. ५४) फुलाची प्रथमावस्था. ५६) वर-वधुची मिरवणूक. ५७) स्त्रियांच्या पंजाबी पोशाखातील तीन वस्त्रे. ६१) विषमच्या विरुद्ध. ६२) बाजरीचे एक नाव. ६३) भारतातील एक राज्य. ६४) जवळचा, घरातला शत्रू.

उभे शब्द : १) रंगविलेले. २) अवस्था, स्थिती. ३) सजीव-निर्जीव सर्व भाग. ४) मासा, मत्स्य. ६) जैन साधू. ७) आवाज, कीर्ती. ८) संगीत सम्राट. ९) पूर्ण नष्ट. १०) एक शब्दालंकार. १३) समीक्षा. १५) जन्मपत्रिकेत आलेल्या अक्षरावरून ठेवलेले नाव. १८) पालिकेतील लोकप्रतिनिधी. १९) घर, निवासस्थान. २१) टिंगल टवाळी. २४) पोष्टाने येणारे पत्र. २५) खसखस लावलेला एक गोड खुसखुशीत पदार्थ. २६) दारावरील खुणेचा आवाज. २७) केव्हा (ग्रा.) २८) हावरटपणा. ३०) एकसारखे, सदोदित. ३६) पूर्ण ऐक्य, भरती. ३७) धनुष्यातून वध करण्यास जाणारे शास्त्र. ३८) खाटीक. ३९) पुष्कळ. ४१) एकावर एक ठेवणे. ४२) थोडक्यात महाराष्ट्र राज्य. ४३) विजयी, कीर्तीमान, दैववान. ४४) एक पाताळ. ४६) लुगडे, पातळ. ४७) उद्यान. ४८) विहीरीचा एक प्रकार. ५०) नकारच्या विरुद्ध. ५१) हृदय. ५३) सटरफटर, किरकोळ सामान. ५४) थोडेफार. ५५) वृद्धी. ५७) मनाचा झालेला ग्रह. ५८) पठण. ५९) ओली झालेली स्त्री. चित्रकार रवि वर्माचे गाजलेले चित्र. ६०) गुरे राखणारा. ६१) मोठा सरळ बांबू. ६२) जिवलग मित्र

शब्दकोड२९८चे उत्तर